# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## जनसंपर्क कक्ष


## दैनंदिन वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेल्या वार्ता

## (दि. १९ नोव्हेंबर २०२५)

# TIMES OF INDIA

## SUK MARKS 63RD FOUNDATION DAY

Rahul Gayakwad



**ACADEMIC MILESTONE:** The 63rd Foundation Day anniversary of Shivaji University, Kolhapur (SUK), was celebrated on Tuesday, in the presence of SUK in-charge vice-chancellor Suresh Gosavi, acting pro-vice-chancellor Jyoti Jadhav, and chief guest Vijay Maheshwari, vice-chancellor of Kaviyatri Bahinabai Chaudhary North Maharashtra University, Jalgaon. The latter lauded the strides made by the varsity, plaudits garnered, and said all segments of society must work towards creating an all-round personality for students. Various awards were given at the ceremony to achievers in the university's ranks. Gosavi in his address said the university is striving to fulfill the goal of 'Developed India@2047'

# दै. पुण्यनगरी

# सक्षम, विकसित राष्ट्रनिर्मितीसाठी शिक्षण हाच पर्याय

## कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी यांचे प्रतिपादन

## शिवाजी विद्यापीठाचा ६३ वा वर्धापन दिन उत्साहात

**। कोल्हापूर : प्रतिनिधी**

सक्षम आणि विकसित राष्ट्राच्या निर्मितीसाठी शिक्षणाला पर्याय नाही. त्यादृष्टीने शिवाजी विद्यापीठाने गेल्या ६३ वर्षांत केलेली वाटचाल अत्यंत दिशादर्शक आहे, असे गौरवोद्‌गार जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी यांनी काढले. शिवाजी विद्यापीठाच्या ६३ व्या वर्धापन दिन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात हा कार्यक्रम झाला.

कुलगुरू डॉ. माहेश्वरी म्हणाले, अवघे पाच अधिविभाग, ३४ महाविद्यालये आणि १४ हजार विद्यार्थ्यांसह सुरुवात केलेल्या शिवाजी विद्यापीठाने या वाटचालीत ३४ अधिविभाग, २९७ महाविद्यालये आणि अडीच लाख विद्यार्थी अशी संख्यात्मक वाटचाल करताना पश्चिम महाराष्ट्राच्या शैक्षणिक उत्थानामध्ये मोलाची भर घातली. राष्ट्रीय पातळीवरील नॅकचे अ++ मानांकन आणि नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्कमध्ये (एनआयआरएफ) आघाडीच्या ५० अकृषी राज्य विद्यापीठांत स्थान प्राप्त करून गुणवत्ताही सिद्ध केली आहे.



**। कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान गटातील उत्कृष्ट अधिविभागासाठीचा पुरस्कार स्वीकारताना जैवतंत्रज्ञान अधिविभागाच्या प्राध्यापक तथा प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि त्यांचे सहकारी.**

अध्यक्षीय भाषणात शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने वाटचालीत सातत्यपूर्ण गती राखली, ही गती योग्य वेळेत योग्य दिशेने ठेवली. या तिन्हीच्या समन्वयातून सर्वंकष प्रगती साधली आहे.

यावेळी विद्यापीठातील, महाविद्यालयांतील गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक, त्यांची गुणवंत पाल्ये यांचा विद्यापीठ प्रशासकीय, तसेच कल्याण निधी पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. प्रशासकीय गुणवत्ता अभियानांतर्गत पुरस्कारप्राप्त प्रशासकीय विभाग व अधिविभाग यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आले.

**विविध पुरस्कार विजेते : विद्यापीठातील गुणवंत शिक्षक :** डॉ. पद्मा दांडगे (जीव रसायनशास्त्र अधिविभाग).

विद्यापीठातील गुणवंत प्रशासकीय सेवक : विजय पोवार (अधीक्षक, कॅशबुक विभाग), विनय पाटील (सहायक अधीक्षक, आस्थापना, पी. जी. विभाग), कल्लाप्पा पोटले (हवालदार, कुलगुरू कार्यालय), राजेंद्र बारड (प्रयोगशाळा परिचर, जीव रसायनशास्त्र अधिवभाग).

संलग्न महाविद्यालयांतील गुणवंत प्राचार्य : डॉ. विठ्ठल शिवणकर (बळवंत महाविद्यालय, विटा, जि. सांगली)

संलग्न महाविद्यालयांतील गुणवंत शिक्षक : डॉ. जयवंत इंगळे (प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय, मलकापूर, जि. कोल्हापूर)

**महाविद्यालयीन गुणवंत सेवक** : प्रकाश कांबळे (मुख्य लिपिक, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज), दिलीप सुवारे (प्रयोगशाळा परिचर, पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील महाविद्यालय, तासगाव, जि. सांगली).

**बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार :** डॉ. विकास मिणचेकर (गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर)

यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी स्वागत केले. धैर्यशील यादव, नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

तत्पूर्वी, प्रमुख पाहुणे कुलगुरू डॉ. माहेश्वरी यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजास वंदन करण्यात आले. डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. महादेव देशमुख, डॉ. राजाराम गुरव, डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. अजय साळी, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सागर डेळेकर, व्यवस्थापन सदस्य सिद्धार्थ शिंदे आदी उपस्थित होते.

### 'नॅक' मानांकित महाविद्यालयांचा गौरव

'नॅक'चे 'अ++', 'अ+' आणि 'अ' मानांकन मिळवणाऱ्या संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा समारंभात सत्कार करण्यात आला. यामध्ये डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय (कला, वाणिज्य व विज्ञान) रामानंदनगर (जि. सांगली), मुधोजी महाविद्यालय फलटण (जि. सातारा), कस्तुरबाई वालचंद कला आणि विज्ञान महाविद्यालय (सांगली) आणि कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पलूस (जि. सांगली) यांचा समावेश आहे.

# दै. तरूण भारत



# गती, दिशा, वेळेच्या समन्वयातून प्रगती

## कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांचे प्रतिपादन : विद्यापीठाच्या ६३ व्या वर्धापनदिनी प्रशासकीय पुरस्कार प्रदान

**शिवाजी विद्यापीठाने आपल्या वाटचालीत सातत्यपूर्ण गती राखली आहे. ही गती योग्य वेळेत योग्य दिशेने ठेवली. या तिन्हीच्या समन्वयातून शिवाजी विद्यापीठाने आपली सर्वंकष प्रगती साधली आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी केले.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या ६३ व्या वर्धापन दिनानिमित्त मंगळवारी जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी यांच्या हस्ते विविध प्रशासकीय पुरस्कार वितरण करण्यात आले. या प्रसंगी कुलगुरू डॉ. गोसावी बोलत होते. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात मंगळवारी हा सोहळा झाला.

विद्यापीठातील, महाविद्यालयातील गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक, त्यांचे गुणवंत पाल्य यांचा विद्यापीठ प्रशासकीय तसेच कल्याण निधी पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. प्रशासकीय गुणवत्ता अभियानांतर्गत पुरस्कार प्राप्त प्रशासकीय विभाग व अधिविभागांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आले.





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात जळगाव विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी यांच्या हस्ते गुणवंत शिक्षक पुरस्कार स्वीकारताना डॉ. पद्मा दांडगे. सोबत प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील आदी. शेजारी कार्यक्रमात बोलताना प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी.

तरुण भारत — विद्यापीठातून

कुलगुरू डॉ. गोसावी म्हणाले, भविष्यातील नव्या युगाची आव्हाने लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना ती पेलण्यास सक्षम करण्याचे उद्दिष्ट बाळगून वाटचाल सुरू आहे. शिवाजी विद्यापीठ केवळ पदवीधर नव्हे, तर विचारवंत, उद्योजक, समाजसेवक आणि राष्ट्रनिर्माते घडवण्यास कटिबद्ध आहे 'विकसित भारत २०४७" या स्वप्नपूर्तीत प्रत्येक विद्यार्थी योगदान देण्यासाठी सिद्ध असेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**जैवतंत्रज्ञान, अर्थशास्त्र उत्कृष्ट**

शिवाजी विद्यापीठाने २०१९ पासून उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार देण्यास सुरवात केली. विज्ञान व तंत्रज्ञान आणि सामाजिक शास्त्रे असे दोन गट करून सर्वंकष काटेकोर मूल्यमापन करण्यात येऊन हा पुरस्कार देण्यात येतो. यंदा उत्कृष्ट अधिविभागांसाठीचा पुरस्कार जैवतंत्रज्ञान आणि अर्थशास्त्र अधिविभाग यांना देण्यात आला. संबंधित विभागाला पारितोषिकापोटी १० लाख रुपये, प्रमाणपत्र आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा प्रदान करण्यात आला.

**'नॅक' मानांकित महाविद्यालयांचा गौरव**

'नॅक'चे 'A++', 'A+' आणि 'A' मानांकन मिळविणाऱ्या संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय (कला, वाणिज्य व विज्ञान), रामानंदनगर (सांगली), मुधोजी महाविद्यालय, फलटण (सातारा), श्रीमती कस्तुरबाई वालचंद कला आणि विज्ञान महाविद्यालय (सांगली) आणि कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पलूस (सांगली) यांचा समावेश आहे.

### पुरस्कार विजेत्यांची नावे अशी :

- गुणवंत शिक्षक : डॉ. पद्मा दांडगे (जीव—रसायनशास्त्र अधिविभाग)
- कै. बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार : डॉ. विकास मिणचेकर, (श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर)
- गुणवंत प्रशासकीय सेवक असे : विजय पोवार, (अधीक्षक, कॅशबुक विभाग), विनय पाटील, (सहायक अधीक्षक, आस्थापना, पी. जी. विभाग), कल्लाप्पा पोटले, (हवालदार, कुलगुरू कार्यालय), राजेंद्र बारड, (प्रयोगशाळा परिचर, जीव—रसायनशास्त्र अधिवभाग).
- संलग्न महाविद्यालयांतील गुणवंत प्राचार्य : डॉ. विठ्ठल शिवणकर (बळवंत महाविद्यालय, विटा, जि. सांगली)
- संलग्न महाविद्यालयांतील गुणवंत शिक्षक : डॉ. जयवंत इंगळे (प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालय, मलकापूर, जि. कोल्हापूर)
- महाविद्यालयीन गुणवंत सेवक : प्रकाश कांबळे (मुख्य लिपिक, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज), दिलीप सुवारे (प्रयोगशाळा परिचर, पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील महाविद्यालय, तासगाव, जि. सांगली).

# दै. तरूण भारत



# विकसित राष्ट्रनिर्मितीसाठी शिवाजी विद्यापीठाचे अमूल्य योगदान

## कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठाचा ६३ वा वर्धापन दिन उत्साहात

तरुण भारत संवाद
विद्यापीठातून

प्रतिनिधी
कोल्हापूर

केवळ शिक्षणामुळेच सक्षम व विकसित राष्ट्राची निर्मिती होऊ शकते. त्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाने गेल्या ६३ वर्षांत शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात केलेली वाटचाल विकसित राष्ट्र निर्मितीसाठी अमूल्य योगदान देणारी ठरली आहे, असे प्रतिपादन जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या ६३ व्या वर्धापन दिन सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते. तर प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात मंगळवारी हा सोहळा संपन्न झाला.

प्रारंभी विद्यापीठाच्या प्रांगणात प्रमुख पाहुणे कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी



कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी

यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते विद्यापीठाच्या प्रांगणात मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर ध्वजावंदन करण्यात आले. यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांचे सदस्य, अधिविभाग प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय सेवक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. माहेश्वरी म्हणाले, उच्चशिक्षण व्यवस्थेकडून सर्वच घटकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. खासगी व परदेशी विद्यापीठांचे आव्हानही सामोरे उभे आहे. अशा यातून मार्ग काढण्यासाठी अतिसूक्ष्म



शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आल. यावेळी सोबत जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी, डॉ. ज्योती जाधव यांच्यासह मान्यवर.

विश्लेषणाबरोबरच संवेदनशील आणि मूल्यवान नागरिक घडविण्याची जबाबदारी निभावावी लागणार आहे. बुद्धिमत्ता विकसन करणारे शिक्षण, सूक्ष्म, सारासार विचार, कौशल्ये, चौफेर व्यक्तीमत्त्व, मुल्यांची जाण असणारे विद्यार्थी घडविणारे शिक्षण देण्याची आवश्यकता आहे. याची जबाबदारी शिक्षक, विद्यार्थी, प्राचार्य, शिक्षकेतर कर्मचारी आणि अधिकार मंडळे या सर्वच घटकांनी स्वीकारण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यानी शिवाजी विद्यापीठाच्या गेल्या वर्षभरातील वाटचालीचा आढावा घेतला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा कुलगुरू असतानाच छत्रपती संभाजीनगरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि आता कोल्हापूरचे शिवाजी विद्यापीठ यांचा प्रभारी कुलगुरू म्हणून काम करण्याची संधी लाभली. यामुळे एकाच वेळी आयुष्यात फुले, शाहू आणि आंबेडकर यांच्या नावाशी आणि कर्मभूमीशी जोडले गेल्याचा अतिशय आनंद व अभिमान वाटत असल्याचेही त्यांनी सांगितले.

### शिवाजी विद्यापीठाची वाटचाल अनुकरणीय

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने सुरू असलेल्या शिवाजी विद्यापीठाची ६३ वर्षांतील वाटचाल अनुकरणीय आहे. या वाटचालीत ३४ अधिविभाग, २९७ महाविद्यालये आणि अडीच लाख विद्यार्थी नवनवीन शिक्षणाचा ध्यास घेत आहेत पश्चिम महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्रांतीमध्ये मोलाची भर घातली आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रीय पातळीवरील नॅकचे मानांकन आणि नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्कमध्ये (एनआयआरएफ) आघाडीच्या ५० अकृषी राज्य विद्यापीठांत स्थान प्राप्त करून आपली गुणवत्ताही सिद्ध केली आहे. जागतिक दर्जाचे अनेक संशोधक या विद्यापीठाने देशाला दिले आहेत. ही एक कौतुकाची बाब असल्याचे गौरवोद्गार डॉ. माहेश्वरी यांनी यावेळी काढले.

विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी स्वागत केले. धैर्यशील यादव, नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. महादेव देशमुख, डॉ. राजाराम गुरव, डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. अजय साळी, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सागर डेळेकर, सिद्धार्थ शिंदे आदी उपस्थित होते.

# दै. लोकमत



## शिवाजी विद्यापीठामुळे पश्चिम महाराष्ट्राची शैक्षणिक प्रगती

### विजय माहेश्वरी : ६३ वा वर्धापनदिन उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सक्षम आणि विकसित राष्ट्राच्या निर्मितीसाठी शिक्षणाला पर्याय नाही. शिवाजी विद्यापीठाने गेल्या ६३ वर्षांत केलेली वाटचाल अत्यंत दिशादर्शक आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या शैक्षणिक प्रगतीत या विद्यापीठाने मोलाची भर घातली असल्याचे गौरवोद्गार जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी यांनी मंगळवारी येथे काढले.

विद्यापीठाच्या ६३ व्या वर्धापनदिन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या समारंभाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव प्रमुख उपस्थित होत्या.

डॉ. माहेश्वरी म्हणाले, उच्चशिक्षण व्यवस्थेकडून सर्वच घटकांच्या वाढत्या अपेक्षा आहेत. त्याचप्रमाणे शैक्षणिक उदासीनतेचेही वातावरण आहे. खासगी आणि परदेशी विद्यापीठांचे आव्हानही आहे. अशा पेचातून मार्ग काढण्यासाठी अतिसूक्ष्म विश्लेषणाबरोबरच संवेदनशील आणि मूल्यवान नागरिक घडविण्याची जबाबदारी आपल्याला निभावावी लागणार आहे.

डॉ. गोसावी म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने आपल्या वाटचालीत सातत्यपूर्ण गती राखली, ही गती योग्य वेळेत योग्य दिशेने ठेवली आहे. भविष्यातही नव्या युगाची आव्हाने लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना ती पेलण्यास सक्षम करण्याचे उद्दिष्ट बाळगून वाटचाल सुरू आहे.

प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी स्वागत केले. धैर्यशील यादव, नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. महादेव देशमुख, डॉ. राजाराम गुरव, डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. अजय साळी उपस्थित होते.

# दै. लोकमत

epaper.lokmat.com | www.lokmat.com
आपला परिसर → लोकमत



शिवाजी विद्यापीठाच्या ६३ व्या वर्धापनदिनानिमित्त मंगळवारी जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. यावेळी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, डॉ. ज्योती जाधव व विद्यार्थी उपस्थित होते.

## 'जैवतंत्रज्ञान', 'अर्थशास्त्र' ठरले उत्कृष्ट

### शिवाजी विद्यापीठातर्फे पद्मा दांडगे, विकास मिणचेकर यांचा गुणवंत-आदर्श पुरस्काराने सन्मान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त देण्यात येणारा उत्कृष्ट अधिविभागांसाठीचा पुरस्कार जैवतंत्रज्ञान आणि अर्थशास्त्र अधिविभाग यांना मंगळवारी देण्यात आला, तर विद्यापीठातील गुणवंत शिक्षकाचा पुरस्कार जीव-रसायनशास्त्र अधिविभागाच्या डॉ. पद्मा बाबूलाल दांडगे यांना, तर बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार जयसिंगपूरच्या श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालयातील डॉ. विकास सदाम मिणचेकर यांना प्रदान करण्यात आला.

जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव उपस्थित होते. विद्यापीठाने २०१९ पासून उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार देण्यास सुरुवात केली.

विज्ञान व तंत्रज्ञान आणि सामाजिक शास्त्रे असे दोन गट करून अधिविभागांचे सर्वंकष काटेकोर मूल्यमापन करण्यात येऊन हा पुरस्कार देण्यात येतो.

संबंधित विभागाला पारितोषिकापोटी दहा लाख रुपये, प्रमाणपत्र आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा प्रदान करण्यात येतो. याच कार्यक्रमात 'नॅक'चे 'ए प्लस प्लस' आणि 'ए प्लस' मानांकन मिळविणाऱ्या संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवर उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापनदिनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात डॉ. विजय माहेश्वरी यांच्या हस्ते डॉ. पद्मा बाबूलाल दांडगे यांना गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. दुसऱ्या छायाचित्रात डॉ. विकास मिणचेकर यांना बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

#### यांचा झाला सन्मान- प्रशासकीय सेवक

विजय रामचंद्र पोवार, अधीक्षक, कॅशबुक विभाग
विनय संभाजीराव पाटील, सहायक अधीक्षक, आस्थापना, पीजी विभाग
कल्लाप्पा दत्तू पोटले, हवालदार, कुलगुरू कार्यालय
राजेंद्र लक्ष्मण बारड, प्रयोगशाळा परिचर, जीव-रसायनशास्त्र अधिविभाग

#### महाविद्यालयांतील गुणवंत प्राचार्य

डॉ. विठ्ठल सुबराव शिवणकर, बळवंत महाविद्यालय, विटा, जि. सांगली

#### महाविद्यालयीन गुणवंत सेवक

प्रकाश मारुती कांबळे, मुख्य लिपिक, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज
अशोक सुवारे, प्रयोगशाळा परिचर, पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील महाविद्यालय, तासगाव, जि. सांगली

# दै. पुढारी



# संवेदनशील, मूल्यवान नागरिक घडविण्याची विद्यापीठांवर जबाबदारी

## कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी; शिवाजी विद्यापीठाचा वर्धापन दिन उत्साहात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सक्षम आणि विकसित राष्ट्राच्या निर्मितीसाठी शिक्षणाला पर्याय नाही. त्यादृष्टीने शिवाजी विद्यापीठाने गेल्या ६३ वर्षांत केलेली वाटचाल दिशादर्शक आहे. संवेदनशील व मूल्यवान नागरिक घडविण्याची जबाबदारी विद्यापीठांवर आहे, असे प्रतिपादन, जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठाच्या ६३ व्या वर्धापन दिन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव प्रमुख उपस्थित होत्या. विद्यापीठातील गुणवंत शिक्षकाचा पुरस्कार जीव-रसायनशास्त्र अधिविभागाच्या डॉ. पद्मा दांडगे यांना तर बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार जयसिंगपूरच्या गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालयातील डॉ. विकास मिणचेकर यांना प्रदान करण्यात आला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ वर्धापन दिन समारंभात कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी यांच्या हस्ते विद्यापीठातील गुणवंत शिक्षक पुरस्कार स्वीकारताना जैव-रसायनशास्त्र अधिविभागाच्या प्रा. डॉ. पद्मा दांडगे. समवेत प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील. दुसऱ्या छायाचित्रात बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार स्वीकारताना डॉ. विकास मिणचेकर.**

**(छाया : अर्जुन टाकळकर)**

कुलगुरू डॉ. माहेश्वरी म्हणाले, उच्चशिक्षण व्यवस्थेकडून सर्वच घटकांच्या वाढत्या अपेक्षा आहेत. त्याचप्रमाणे शैक्षणिक उदासीनतेचेही वातावरण आहे. खासगी व परदेशी विद्यापीठांचे आव्हानही सामोरे उभे आहे.

अध्यक्षीय भाषणात प्रभारी कुलगुरू डॉ. गोसावी यांनी शिवाजी विद्यापीठाच्या गेल्या वर्षभरातील वाटचालीचा थोडक्यात वेध घेतला. एकाचवेळी आयुष्यात फुले, शाहू आणि आंबेडकर यांच्या नावाशी आणि कर्मभूमीशी जोडले गेल्याचा अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले, विद्यापीठाने वाटचालीत सातत्यपूर्ण गती राखली. ही गती योग्य वेळेत योग्य दिशेने ठेवली. शिवाजी विद्यापीठ केवळ पदवीधर नव्हे तर विचारवंत, उद्योजक, समाजसेवक व राष्ट्रनिर्माते घडविण्यास कटिबद्ध आहे.

याप्रसंगी विद्यापीठातील, महाविद्यालयांतील गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक, त्यांची गुणवंत पाल्ये यांचा विद्यापीठ प्रशासकीय व कल्याण निधी पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. प्रशासकीय गुणवत्ता अभियानांतर्गत पुरस्कारप्राप्त प्रशासकीय विभाग व अधिविभाग यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आले. धैर्यशील यादव, नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

तत्पूर्वी, विद्यापीठाच्या प्रांगणात प्रमुख पाहुणे कुलगुरू डॉ. माहेश्वरी यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. महादेव देशमुख, डॉ. राजाराम गुरव, डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. अजय साळी, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे उपस्थित होते.

### 'नॅक' मानांकित महाविद्यालयांचा गौरव

'नॅक'चे 'A++', 'A+' आणि 'A' मानांकन मिळविणाऱ्या संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा समारंभात सत्कार करण्यात आला. यामध्ये डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय (कला, वाणिज्य व विज्ञान), रामानंदनगर (जि. सांगली), मुधोजी महाविद्यालय, फलटण (जि. सातारा), कस्तुरबाई वालचंद कला आणि विज्ञान महाविद्यालय (सांगली) आणि कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पलूस (जि. सांगली) या महाविद्यालयांचा समावेश आहे.

# दै. सकाळ



# विकसित राष्ट्रनिर्मितीसाठी शिक्षण हाच पर्याय

## कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी : शिवाजी विद्यापीठाचा ६३ वा वर्धापन दिन उत्साहात

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १८ : 'सक्षम आणि विकसित राष्ट्राच्या निर्मितीसाठी शिक्षणाला पर्याय नाही. त्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाने गेल्या ६३ वर्षांत केलेली वाटचाल अत्यंत दिशादर्शक आहे. जागतिक दर्जाचे अनेक संशोधक या विद्यापीठाने देशाला दिले आहेत. प्रत्येक घटकाची समर्पणशील वृत्ती आणि निष्ठा यामुळेच हे शक्य झाले आहे', असे प्रतिपादन जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी यांनी आज येथे केले.**

शिवाजी विद्यापीठाच्या ६३ व्या वर्धापन दिन समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून होते. राजर्षी शाहू सभागृहातील या समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव प्रमुख उपस्थित होत्या. विद्यापीठातील गुणवंत शिक्षक पुरस्काराने जीव-रसायनशास्त्र अधिविभागाच्या डॉ. पद्मा दांडगे यांना, तर बॅरिस्टर पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्काराने जयसिंगपूरच्या श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालयातील डॉ. विकास मिणचेकर यांना गौरविण्यात आले.

'विद्यापीठाने आपल्या वाटचालीत सातत्यपूर्ण गती राखली, ही गती योग्य वेळेत योग्य दिशेने ठेवली. या तिन्हींच्या समन्वयातून शिवाजी विद्यापीठाने आपली सर्वंकष प्रगती साधली असल्याचे प्रभारी कुलगुरू डॉ. गोसावी यांनी सांगितले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण झाले. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी पसायदान सादर केले. धैर्यशील यादव, नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

दरम्यान, सकाळी साडेआठच्या सुमारास विद्यापीठाच्या प्रांगणात कुलगुरू डॉ. माहेश्वरी यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. प्रभारी कुलगुरू डॉ. गोसावी यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजास वंदन करण्यात आले. यावेळी डॉ. अजितसिंह जाधव, सुहासिनी पाटील, तानाजी चौगुले, महादेव देशमुख, राजाराम गुरव, वर्षा मैंदर्गी, अजय साळी, सिद्धार्थ शिंदे आदी उपस्थित होते.

### संवेदनशील नागरिक घडविण्याची जबाबदारी

**'उच्चशिक्षण व्यवस्थेकडून सर्वच घटकांच्या वाढत्या अपेक्षा आहेत. शैक्षणिक उदासीनतेचेही वातावरण आहे. खासगी, परदेशी विद्यापीठांचे आव्हान समोर उभे आहे. या पेचातून मार्ग काढण्यासाठी अतिसूक्ष्म विश्लेषणासह संवेदनशील, मूल्यवान नागरिक घडविण्याची जबाबदारी आपल्याला निभवावी लागणार आहे. त्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक असल्याचे कुलगुरू डॉ. माहेश्वरी यांनी सांगितले.**

### गुणवंत शिक्षक, सेवकांचा गौरव

या कार्यक्रमात गुणवंत शिक्षक, प्राचार्य, सेवकांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यात विजय पोवार, विनय पाटील, कल्लाप्पा पोटले, राजेंद्र बारड, डॉ. विठ्ठल शिवणकर, जयवंत इंगळे, प्रकाश कांबळे, दिलीप सुवासे यांचा समावेश होता. विद्यापीठातील जैवतंत्रज्ञान, अर्थशास्त्र अधिविभागाला उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पलूस, श्रीमती कस्तुरबाई वालचंद कला आणि विज्ञान महाविद्यालय, सांगली, मुधोजी महाविद्यालय, फलटण या 'नॅक' मानांकित महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार करण्यात आला.



**कोल्हापूर :** जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाचा 'गुणवंत शिक्षक पुरस्कार' स्वीकारताना जैव-रसायनशास्त्र अधिविभागाच्या प्रा. डॉ. पद्मा दांडगे आणि 'बॅरिस्टर पी. जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार' स्वीकारताना डॉ. विकास मिणचेकर. यावेळी शेजारी प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, डॉ. ज्योती जाधव, व्ही. एन. शिंदे, अजितसिंह जाधव, सुहासिनी पाटील उपस्थित होत्या.

# सिंधुदुर्ग समाचार

epaper : www.sindhudurgsamachar.com
Mahrashtra : 9422043543 Goa : 9673153300 Karnataka : 9422043300

सिंधुदुर्ग समाचार

ऐकत रहा mango FM 90.4

संस्थापक संपादक : भाऊसाहेब कदम

कोल्हापूर

Posted at RMS Kolhapur Postal Reg No : KLR/170/2024-2026

● बुधवार दि.१९ नोव्हेंबर २०२५ ● पाने ४ ● वर्ष ३५ ● अंक २६५ ● कोल्हापूर, सिंधुदुर्ग, मुंबई, रत्नागिरी, सांगली, सातारा, बेळगाव, गोवा येथून प्रसिध्द ● e-mail: klpsindhu@gmail.com ● RNI NO : MAHMAR/2006/17335 ● किंमत १ ●

# सक्षम, विकसित राष्ट्रनिर्मितीसाठी शिक्षण हाच पर्याय : डॉ. विजय माहेश्वरी

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

सक्षम आणि विकसित राष्ट्राच्या निर्मितीसाठी शिक्षणाला पर्याय नाही. त्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठाने गेल्या ६३ वर्षांत केलेली वाटचाल अत्यंत दिशादर्शक आहे, असे गौरवोद्गार जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी यांनी आज येथे काढले.

शिवाजी विद्यापीठाच्या ६३ व्या वर्धापन दिन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या समारंभाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव प्रमुख उपस्थित होत्या.

विद्यापीठातील गुणवंत शिक्षकाचा पुरस्कार जीव-रसायनशास्त्र अधिविभागाच्या डॉ. पद्मा बाबूलाल दांडगे यांना, तर बॅ. पी.जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार जयसिंगपूरच्या श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालयातील डॉ. विकास सदाम मिणचेकर यांना प्रदान करण्यात आला.

कुलगुरू डॉ. माहेश्वरी यांनी आपल्या भाषणामध्ये शिक्षणाचे मानवी जीवनातील महत्त्व अनेक उदाहरणांसह अधोरेखित केले. ते म्हणाले, उच्चशिक्षण व्यवस्थेकडून सर्वच घटकांच्या वाढत्या अपेक्षा आहेत. त्याचप्रमाणे शैक्षणिक उदासिनतेचेही वातावरण आहे. खासगी आणि परदेशी विद्यापीठांचे आव्हानही सामोरे उभे आहे. अशा पेचातून मार्ग काढण्यासाठी अतिसूक्ष्म विश्लेषणाबरोबरच संवेदनशील आणि मूल्यवान नागरिक घडविण्याची जबाबदारी आपल्याला निभावावी लागणार आहे. बुद्धिमत्ता विकसन करणारे शिक्षण, सूक्ष्म आणि सारासार विचार करणारे आणि मूल्यांची जाण असणारे विद्यार्थी घडविणारे शिक्षण तसेच विविध कौशल्ये प्रदान करणारे शिक्षण असे विद्यार्थ्यांचे चौफेर व्यक्तीमत्त्व घडविण्याची आवश्यकता आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे या बाबींसाठी सक्षम आहे. तथापि, त्याची अंमलबजावणी तितक्याच प्रभावी आणि सक्षम पद्धतीने करण्याची जबाबदारी शिक्षक, विद्यार्थी, प्राचार्य, शिक्षकेतर कर्मचारी आणि अधिकार मंडळे या सर्वच घटकांनी स्वीकारण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

### 'शिवाजी विद्यापीठाची वाटचाल अनुकरणीय'

महाराष्ट्राचे आराध्यदैवत, राष्ट्रपुरूष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने स्थापन झालेल्या शिवाजी विद्यापीठाची गेल्या ६३ वर्षांतील वाटचाल ही अनुकरणीय स्वरुपाची असल्याचे कौतुकोद्गार कुलगुरू डॉ. माहेश्वरी यांनी या प्रसंगी काढले. ते म्हणाले, अवघे पाच अधिविभाग, ३४ महाविद्यालये आणि १४ हजार विद्यार्थ्यांसह सुरवात केलेल्या शिवाजी विद्यापीठाने या वाटचालीत ३४ अधिविभाग, २९७ महाविद्यालये आणि अडीच लाख विद्यार्थी अशी संख्यात्मक वाटचाल करीत असताना पश्चिम महाराष्ट्राच्या शैक्षणिक उत्थानामध्ये मोलाची भर घातली. त्याचप्रमाणे राष्ट्रीय पातळीवरील नॅकचे A++ मानांकन आणि




नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्कमध्ये (एनआयआरएफ) आघाडीच्या ५० अकृषी राज्य विद्यापीठांत स्थान प्राप्त करून आपली गुणवत्ताही सिद्ध केली आहे. जागतिक दर्जाचे अनेक संशोधक या विद्यापीठाने देशाला दिले आहेत. त्यांच्या संशोधनाचा दबदबा सर्वदूर आहे. प्रत्येक घटकाची समर्पणशील वृत्ती आणि निष्ठा यामुळेच हे शक्य झाले आहे, असेही ते म्हणाले.

### गती, दिशा आणि वेळ यांमधील समन्वयामुळेच प्रगती: कुलगुरू डॉ. गोसावी

आपल्या अध्यक्षीय भाषणात शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी शिवाजी विद्यापीठाच्या गेल्या वर्षभरातील वाटचालीचा थोडक्यात वेध घेतला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा कुलगुरू असतानाच छत्रपती संभाजीनगरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि आता कोल्हापूरचे शिवाजी विद्यापीठ यांचा प्रभारी कुलगुरू म्हणून काम करण्याची संधी लाभली. यामुळे एकाच वेळी आयुष्यात फुले, शाहू आणि आंबेडकर यांच्या नावाशी आणि कर्मभूमीशी जोडले गेल्याचा अतिशय आनंद आणि अभिमान वाटत असल्याचेही त्यांनी सांगितले.

ते म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने आपल्या वाटचालीत सातत्यपूर्ण गती राखली, ही गती योग्य वेळेत योग्य दिशेने ठेवली. या तिन्हीच्या समन्वयातून शिवाजी विद्यापीठाने आपली सर्वंकष प्रगती साधली आहे. विद्यापीठाच्या लौकिकाला पुढे घेऊन जातील, असे अनेकविध उपक्रम यशस्वीपणे राबवित आहोत. भविष्यातही नव्या युगाची आव्हाने लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना ती पेलण्यास सक्षम करण्याचे उद्दिष्ट बाळगून वाटचाल सुरू आहे. भविष्य हे ज्ञान, कौशल्य, संशोधन आणि मूल्याधारित शिक्षणावर उभे आहे. शिवाजी विद्यापीठ केवळ पदवीधर नव्हे, तर विचारवंत, उद्योजक, समाजसेवक आणि राष्ट्रनिर्माते घडविण्यास कटिबद्ध आहे. "विकसित भारत@२०४७" या स्वप्नपूर्तीत आपला प्रत्येक विद्यार्थी सक्रिय योगदान देण्यासाठी सिद्ध असेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या वेळी विद्यापीठातील, महाविद्यालयांतील गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक, त्यांची गुणवंत पाल्ये यांचा विद्यापीठ प्रशासकीय तसेच कल्याण निधी पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. तसेच, प्रशासकीय गुणवत्ता अभियानांतर्गत पुरस्कार प्राप्त प्रशासकीय विभाग व अधिविभाग यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आले.

### जैवतंत्रज्ञान, अर्थशास्त्र अधिविभाग ठरले उत्कृष्ट

शिवाजी विद्यापीठाने सन २०१९ पासून उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार देण्यास सुरवात केली. विज्ञान व तंत्रज्ञान आणि सामाजिक शास्त्रे असे दोन गट करून अधिविभागांचे सर्वंकष काटेकोर मूल्यमापन करण्यात येऊन हा पुरस्कार देण्यात येतो. संबंधित विभागाला पारितोषिकापोटी दहा लाख रुपये, प्रमाणपत्र आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा प्रदान करण्यात येतो. यंदा उत्कृष्ट अधिविभागांसाठीचा पुरस्कार जैवतंत्रज्ञान आणि अर्थशास्त्र अधिविभाग यांना देण्यात आला.

### 'नॅक' मानांकित महाविद्यालयांचा गौरव

'नॅक'चे 'A++', 'A+' आणि 'A' मानांकन मिळविणाऱ्या संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा समारंभात सत्कार करण्यात आला. यामध्ये डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय (कला, वाणिज्य व विज्ञान), रामानंदनगर (जि. सांगली), मुधोजी महाविद्यालय, फलटण (जि. सातारा), श्रीमती कस्तुरबाई वालचंद कला आणि विज्ञान महाविद्यालय (सांगली) आणि कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पलूस (जि. सांगली) या महाविद्यालयांचा समावेश आहे.

वर्धापन दिन समारंभात प्रदान करण्यात आलेल्या विविध पुरस्कार विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे:

विद्यापीठातील गुणवंत शिक्षक: डॉ. पद्मा बाबुलाल दांडगे, जीव-रसायनशास्त्र अधिविभाग

विद्यापीठातील गुणवंत प्रशासकीय सेवक:

१. विजय रामचंद्र पोवार, अधीक्षक, कॅशबुक विभाग

२. विनय संभाजीराव पाटील, सहायक अधीक्षक, आस्थापना, पी.जी. विभाग

३. कल्लाप्पा दत्तू पोटले, हवालदार, मा. कुलगुरू कार्यालय

४. राजेंद्र लक्ष्मण बारड, प्रयोगशाळा परिचर, जीव-रसायनशास्त्र अधिवभाग

संलग्न महाविद्यालयांतील गुणवंत प्राचार्य:

१. डॉ. विठ्ठल सुबराव शिवणकर, बळवंत महाविद्यालय, विटा, जि. सांगली

संलग्न महाविद्यालयांतील गुणवंत शिक्षक:

१. डॉ. जयवंत शंकरराव इंगळे, प्रा.डॉ. एन.डी. पाटील महाविद्यालय, मलकापूर, जि. कोल्हापूर

महाविद्यालयीन गुणवंत सेवक:

१. प्रकाश मारुती कांबळे, मुख्य लिपिक, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज

२. दिलीप अशोक सुवारे, प्रयोगशाळा परिचर, पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील महाविद्यालय, तासगाव, जि. सांगली

कै. बॅ. पी.जी. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार: डॉ. विकास सदाम मिणचेकर, श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर

यावेळी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी स्वागत, प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी पसायदान सादर केले. धैर्यशील यादव, नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

तत्पूर्वी, विद्यापीठाच्या प्रांगणात प्रमुख पाहुणे कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजास वंदन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, प्रभारी अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. राजाराम गुरव, डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. अजय साळी, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, आयक्यूएसी कक्षाचे संचालक डॉ. सागर डेळेकर, राज्यपाल नामनिर्देशित व्यवस्थापन सदस्य सिद्धार्थ शिंदे यांच्यासह विविध अधिकार मंडळांचे सदस्य, अधिविभाग प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय सेवक, त्यांचे कुटुंबिय, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दै. जनप्रवास



# शिवाजी विद्यापीठाचे प्रशासन अव्वल

## उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सर्वेक्षणात व्दितीय क्रमांक : दर्जेदार शिक्षण, संशोधनानंतर प्रशासकीय कामातही मोहोर

**जनप्रवास : कोल्हापूर, अहिल्या परकाळे**

शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी दर्जेदार शिक्षणासह प्रशासकीय कामकाजही उत्तम केले. त्यावर आतापर्यंतच्या १३ कुलगुरूंनी मोहोर उमटवली आहे. प्रशासकीय कामकाज करणारे सर्वच अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या उत्कृष्ट कामामुळे शिवाजी विद्यापीठाने राज्यात व्दितीय क्रमांक मिळवला आहे. याचाच अर्थ शिक्षण, संशोधन, पेटंटनंतर आता प्रशासकीय कामातील शिवाजी विद्यापीठ अव्वल असल्याने सिध्द झाले आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे सर्व विद्यापीठांना आकृतीबंध, सेवा प्रवेश नियम, सर्व संवर्गाची अद्ययावत ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करणे, पदोन्नतीने नियुक्तीची स्थिती, सरळ सेवा नियुक्ती रिक्त परिस्थिती, बिंदूनामावली प्रमाणीकरण, अनुकंपा नियुक्ती, आयजीओटी पोर्टलवर रजिस्ट्रेशन व पाच कोर्स पूर्ण करणे यासह सर्व कर्मचाऱ्यांचे सेवा पुस्तक अद्ययावत



करणे व डिजिटल करणे या कामांसाठी १०० गुणांसाठी सर्वेक्षण केले. यामध्ये गोंडवाना विद्यापीठाला सर्वाधिक ६८ तर मुंबई विद्यापीठ ६६ व शिवाजी विद्यापीठाला ६६ गुण मिळाले. त्यामुळे प्रशासकीय कामातही शिवाजी विद्यापीठाने व्दितीय क्रमांक मिळवला आहे.

हे आतापर्यंतच्या १३ कुलगुरूंनी आपआपल्या परिने शिक्षण, संशोधन आणि प्रशासकीय कामात उल्लेखनीय कार्य केल्याचे यश आहे. या यशाबद्दल शिवाजी विद्यापीठाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्राला पूर्वी नळकी पदवी म्हणून हिणवले जायचे, परिणामी राज्यभर कोठेही नोकरी किंवा उच्च शिक्षणाची संधी मिळत नव्हती. त्याच विद्यापीठाने आता प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या सर्वच विद्यापीठांना मागे टाकून शिक्षण, संशोधन आणि प्रशासकीय कामात आपला दबदबा निर्माण केला आहे.

### विद्यार्थी केंद्रीत प्रशासन करण्याचा प्रयत्न

शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्यापासून प्रशासनाची वेगळी ओळख आहे. आतापर्यंतच्या सर्वच कुलगुरु, अधिकारी, कर्मचाऱ्यांनी प्रशासनाची घडी बसवण्याचा प्रयत्न केला, त्याचे फलित म्हणून प्रशासकीय कामकाजात राज्यात व्दितीय क्रमांक मिळवला. भविष्यात आणखी उत्कृष्ट, कार्यक्षम आणि विद्यार्थी केंद्रीत प्रशासन देण्याचा प्रयत्न राहील.

– डॉ. व्ही. एन. शिंदे (कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ)

यामध्ये शिवाजी विद्यापीठाने सुरूवातीला वेळेत म्हणजे ४५ दिवसात परीक्षांचे निकाल जाहीर करण्याचे बंधन असते. त्यामुळे यापूर्वी ३० ते ३५ दिवसांत तर सध्या ऑनस्क्रीन पेपर तपासणीमुळे २० दिवसांत निकाल जाहीर होतो. हे प्रशासनाचे मोठे यशच म्हणावे लागेल. एवढेच नव्हे तर ज्या दिवशी व्हायवा झाला, त्याच दिवशी पीएच. डी. पदवी प्रदान पत्र दिले जाते. त्याचबरोबर युजीसीच्या नॅक मानांकनात ए मानांकनानंतर एप्लस आणि गतवेळी एप्लसप्लस मानांकन मिळवून राज्यात नंबर वनचे विद्यापीठ म्हणून ओळख निर्माण केली.

त्यानंतर एनआयआरएफ मानांकनात देशातील १०० ते १५० वरून पहिल्या ४५ मध्ये येवून शिवाजी विद्यापीठातील संशोधनाचा दर्जा निश्चित केला. याचाच अर्थ शिवाजी विद्यापीठ दर्जेदार शिक्षण, संशोधनासह प्रशासकीय कामातही राज्यात अव्वल क्रमांक मिळवत राज्यातील सर्वच विद्यापीठांसमोर प्रशासकीय कामातही आदर्शवत कामगिरी केली आहे.

### प्रशासकीय १० पैकी विभागवार मिळालेले गुणांकन

| प्रशासकीय विभागाचे नाव | गुण |
| --- | --- |
| आकृतीबंध | ०० |
| सेवाप्रवेश नियम | ४ |
| सर्व संवर्गाची अद्ययावत जेष्ठतासूची प्रसिध्दी करणे | १० |
| पदोन्नतीने नियुक्तीची स्थिती | १० |
| सरळसेवा नियुक्ती रिक्त पदस्थिती | ४ |
| बिंदुनामावली प्रमाणीकरण | ८ |
| अनुकंपा नियुक्ती | १० |
| पोर्टलवर रजिस्टेशन पाच कोर्स पूर्ण करणे | ०० |
| सर्व कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक अद्ययावत व डिजिटल करणे | २० |
| एकूण गुण | ६६ |

### संशोधनाचा वाढता आलेख

| | |
| --- | --- |
| संशोधनासाठी देश व राज्य पातळीवरील निधी: | १०० कोटींपेक्षा जास्त |
| स्कॅन फोर्ड विद्यापीठाच्या सर्वेक्षणातील संशोधकांच्या टॉप टूच्या यादीत : | २० |
| संशोधक एडी सायंटिफिक इंडेक्समध्ये : | १०० संशोधक |
| एनआयआरएफ राज्य विद्यापीठात देशात : | ४५ या रँक बँन्ड |
| स्टार्टअपसाठी : | १० संशोधकांना निधी |
| संशोधनासाठी फेलोशिप : | १०० विद्यार्थी |
| मिळालेले संशोधन प्रकल्प : | ५० प्राध्यापक |
| आतापर्यंत प्रसिध्द झालेले संशोधन पेपर : | ७ हजार |
| विद्यापीठाला मिळालेली पेटंट : | १५० |
| देशविदेशातील सामंजस्य करार : | १५० |
| स्टार्टअप : | १०५ |

दै. लोकमत

# 'न्याय आपल्या दारी'चे उदघाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठ विधि अधिविभाग आणि जिल्हा विधि सेवा प्राधिकरण यांच्यातर्फे फिरत्या लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी विधि अधिविभाग प्रमुख डॉ. विवेक धुपदाळे यांनी 'न्याय आपल्या दारी गाडी' या फिरत्या वाहनाचे उद्घाटन केले.

यावेळी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पंकज अहिर यांनी पोक्सो, रॅगिंग, समुपदेशन या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, पोक्सो कायद्यामध्ये किमान जी शिक्षेची तरतूद आहे, ती शिक्षा देणे हे अपेक्षित आहे. डॉ. विवेक धुपदाळे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी ॲड. प्रमोद दाभाडे, जिल्हा विधि सेवा प्राधिकरण सहायक अधीक्षक राजेंद्र सोनुले, अभिजित खोत, आकाश कुंभार, शिवरत्न माने, ओंकार शेळके, गार्गी कुलकर्णी, दिनकर कबीर यांच्यासह विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी सत्यजित कुंभार यांनी आभार मानले.

# दै. पुण्यनगरी

## विवेकानंद महाविद्यालयामध्ये रसायनशास्त्र विषयावर कार्यशाळा

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातर्फे अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत 'ॲनालिटिकल टेक्निक्स ॲप्लिकेशन इन फार्मासिटिकल ॲनालिसिस अँड क्वॉलिटी कंट्रोल' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा पार पडली.

न्यू कॉलेज क्लस्टर अंतर्गत आयोजित या कार्यशाळेत विवेकानंद महाविद्यालयासह न्यू कॉलेज, शहाजी कॉलेज, कॉमर्स कॉलेज, छत्रपती शाहू कॉलेज या महाविद्यालयांतील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ व दुपारच्या सत्रात डॉ. रवींद्र गायकवाड (भारती विद्यापीठ फार्मसी कॉलेज) व डॉ. अजित एकल (इन्स्टा व्हिजन, सातारा) यांनी विद्यार्थ्यांना औषधनिर्मितीत वापरल्या जाणाऱ्या विश्लेषणात्मक तंत्रज्ञानाचे महत्त्व, औषधांचे रासायनिक पृथ्थकरण, दर्जा नियंत्रित ठेवण्याची प्रक्रिया, तसेच या क्षेत्रातील उपलब्ध रोजगार संधी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्र. प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, डॉ. श्रुती जोशी, डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. व्ही. बी. वाघमारे, डॉ. ए. एस. तपासे, डॉ. एस. डी. शिर्के, रजिस्ट्रार एस. के. धनवडे व प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

# दै. पुढारी

**संक्षिप्त**



कोल्हापूर : विद्यापीठात 'फिरते लोक न्यायालय' वाहनाचे उद्घाटन करताना विधी अधिविभाग प्रमुख डॉ. विवेक धुपदाळे, न्या. पंकज आहिर, सत्यजित कुंभार आदी. (छाया : अर्जुन टाकळकर)

## विद्यापीठात 'न्याय आपल्या दारी' उपक्रमाचे स्वागत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ विधी अधिविभाग आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने विधी विभागाच्या प्रांगणामध्ये फिरते लोकन्यायालय 'न्याय आपल्या दारी' उपक्रमाचे स्वागत करण्यात आले. विधी अधिविभाग प्रमुख. डॉ. विवेक धुपदाळे यांनी 'न्याय आपल्या दारी' वाहनाचे उद्घाटन केले. याप्रसंगी जिल्हा न्यायालयाचे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पंकज आहिर यांनी पोक्सो, रॅगिंग, मेडिटेशन या विषयावर विधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सत्यजित कुंभार यांनी आभार मानले. यावेळी ॲड. प्रमोद दाभाडे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सहायक अधीक्षक राजेंद्र सोनुले, अभिजित खोत, आकाश कुंभार, शिवरत्न माने, ओंकार शेळके, पूजा लोहार, सादिका संबोधी, गार्गी कुलकर्णी, दिनकर कबीर आदी उपस्थित होते.

# दै. सकाळ




कोल्हापूर : आयएसटीईचा 'बेस्ट नॉलेज सेंटर' पुरस्कार डॉ. विलास सपकाळ, डॉ. राकेश जैन यांच्याकडून डॉ. मोहन वनरोट्टी व डॉ. रोहन पवार यांनी स्वीकारला.

## केआयटीला 'बेस्ट नॉलेज सेंटर' राष्ट्रीय पुरस्कार

कंदलगाव, ता. १८ : केआयटी अभियांत्रिकी (प्रदत्त स्वायत्त) महाविद्यालयाला २०२४-२५ चा सर्वोत्कृष्ट ज्ञान केंद्र (पदवी) या पुरस्काराने सन्मानित केले.

महाराष्ट्र गोवा विभागाचा हा सर्वोत्कृष्ट पुरस्कार आहे. ९० हजार पुस्तके, ३७ हजार ई-जर्नल्स वा रिसोर्सेस, प्लेग्यारिझम चेक करायचे सॉफ्टवेअर, अवांतर वाचनाची शेकडो पुस्तके अशा एक ना अनेक गोष्टींनी परिपूर्ण असणाऱ्या केआयटीच्या ग्रंथालयात स्पर्धा परीक्षा आहे. सैन्य अधिकारी भरतीसंदर्भातील पुस्तके ही आहेत. अशा शैक्षणिक सुविधांची राष्ट्रीय स्तरावर घेतलेली दखल म्हणजे हा पुरस्कार आहे, असे मत संचालक डॉ. मोहन वनरोट्टी यांनी व्यक्त केले.

इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन (आयएसटीई) या तंत्रशिक्षणातील शिक्षकांचे व्यावसायिक करिअर आणि विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास साधणाऱ्या या राष्ट्रीय संस्थेने हा पुरस्कार जाहीर केला आहे. पुरस्कार वितरण पुणे येथे झाले. संस्थेचे संचालक डॉ. मोहन वनरोट्टी व ग्रंथपाल डॉ. रोहन पोवार यांनी पुरस्कार स्वीकारला.

# दै. तरूण भारत

बुधवार, १९ नोव्हेंबर २०२५

## ‘बेस्ट नॉलेज सेंटर’ राष्ट्रीय पुरस्काराने केआयटी सन्मानित

प्रतिनिधी
कोल्हापूर

येथील केआयटी अभियांत्रिकी (प्रदत्त स्वायत्त) महाविद्यालयाला सन २०२४-२५ चा सर्वोत्कृष्ट ज्ञान केंद्र (पदवी) या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. महाराष्ट्र गोवा विभागाचा हा सर्वोत्कृष्ट पुरस्कार आहे.

९० हजार पुस्तके, ३७ हजार ई-जर्नल्स व रिसोर्सेस, प्लेग्यारिझम चेक करायचे सॉफ्टवेअर, अवांतर वाचनाची शेकडो पुस्तके अशा एक ना अनेक गोष्टींनी परिपूर्ण असणाऱ्या केआयटीच्या ग्रंथालयात स्पर्धा परीक्षांसह सैन्य अधिकारी भरती संदर्भातील पुस्तकेही आहेत. अशा शैक्षणिक सुविधांची राष्ट्रीय स्तरावर घेतलेली दखल म्हणजे हा पुरस्कार आहे असे प्रतिपादन संस्थेचे संचालक डॉ. मोहन वनरोट्टी यांनी हा पुरस्कार स्वीकारल्यानंतर भावना व्यक्त करताना केले.

इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन (आयएसटीई) या तंत्रशिक्षणातील शिक्षकांचे व्यावसायिक करिअर आणि विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास साधणाऱ्या या राष्ट्रीय संस्थेने हा पुरस्कार जाहीर केला आहे. केआयटीचे ग्रंथालय हे केवळ पुस्तक ठेवण्याचे ठिकाण न राहता माहिती, संशोधन आणि आधुनिक शिक्षणाचे एक केंद्र म्हणून ते कार्यरत असल्याचे या पुरस्काराने सिद्ध झाले.



कोल्हापूर : ‘बेस्ट नॉलेज सेंटर’ पुरस्कार डॉ. विलास सपकाळ, डॉ. राकेश जैन यांच्या हस्ते स्वीकारताना डॉ. मोहन वनरोट्टी व डॉ. रोहन पवार.

पुरस्कार वितरण सोहळा शुक्रवार, दि. १४ नोव्हेंबर २५ रोजी पुणे येथे मुख्य अतिथी डॉ. विलास सपकाळ, कुलगुरु एमजीएम युनिव्हर्सिटी, डॉ. राकेश जैन, कुलगुरु अजिंक्य डी. वाय.पाटील युनिव्हर्सिटी पुणे यांच्या हस्ते व डॉ. प्रतापसिंह देसाई, अध्यक्ष आयएसटीई न्यू दिल्ली यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

संस्थेचे संचालक डॉ. मोहन वनरोट्टी व ग्रंथपाल डॉ. रोहन पोवार या दोघांनी हा पुरस्कार स्वीकारला. संस्थेचे अध्यक्ष साजिद हुदली, उपाध्यक्ष सचिन मेनन, सचिव दीपक चौगुले अन्य विश्वस्त यांचे मोलाचे सहकार्य प्रोत्साहन या ज्ञान केंद्राच्या विकासासाठी मिळाले. भविष्यात ही वास्तु, हे केंद्र अनेक विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरेल असे मत संस्थेचे अध्यक्ष साजिद हुदली यांनी व्यक्त केले. ग्रंथालयाचे मध्यवर्ती समन्वयक डॉ. मंदार सोनटक्के, वरिष्ठ ग्रंथालय क्लार्क अनुपमा सावंत यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# दै. पुढारी

## परदेशात पीजी, पीएचडीसाठी ऑनलाईन अर्जाची मुदत २५ डिसेंबरपर्यंत

कोल्हापूर : केंद्र शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण (पीजी आणि पीएचडी) घेण्यासाठी अर्ज करण्यासाठी २५ डिसेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. परदेशी उच्च शिक्षणासाठी अर्ज करण्यासाठी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयातर्फे परदेशी शिष्यवृत्ती दिली जाते. या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत वाढवण्यात आली आहे. यासाठी परदेशातील शिक्षण संस्था जागतिक क्रमवारीत ४० च्या आत असणे आवश्यक आहे. पदव्युत्तर किंवा पीएचडीसाठी ६० टक्के गुण असणे गरजेचे आहे. अधिक माहिती www.nosmje.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# दै. सकाळ

दृष्टिक्षेपात

## आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी शिवमची निवड


शिवम हवालदार

घुणकी : कोल्हापूर विभागीय क्रीडा परिषदेअंतर्गत झालेल्या शिवाजी विद्यापीठ विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत ४७ ते ५० किलो वजनीगटात डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पस तळसंदेच्या शिवम हवालदार याने दुसरा क्रमांक पटकविला. त्यामुळे त्याची आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. शहाजी छत्रपती महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठ क्रीडा संकुल येथे झालेल्या विभागीय स्पर्धेत त्याने बॉक्सिंगमध्ये ठसा उमटवला. त्यामुळे आंतरविभागीय स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे. स्पर्धा १९ व २० नोव्हेंबर रोजी होणार आहेत. त्याला संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज पाटील, ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील, आदींचे मार्गदर्शन लाभले.